# संविधान (एकशे चारावी सुधारणा) अधिनियम, २०१९

[२१ जानेवारी, २०२०.]

भारताचे संविधान यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

तो, भारतीय गणराज्याच्या सत्तराव्या वर्षी,संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो:-

**संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

**१.** (१) या अधिनियमास, संविधान (एकशे चारावी सुधारणा) अधिनियम, २०१९ असे म्हणावे.

(२) तो, २५ जानेवारी, २०२० रोजी अंमलात येईल.

**अनुच्छेद ३३४ ची सुधारणा.**

**२.** संविधानाच्या अनुच्छेद ३३४ मध्ये,-

(क) समास टिपेऐवजी, पुढील समास टीप दाखल करण्यात येईल:-

"**विवक्षित कालावधीनंतर जागांचे आरक्षण व विशेष प्रतिनिधित्व समाप्त होणे.**-";

(ख) खंड (क) व (ख) नंतरच्या दीर्घ ओळीमध्ये, "सत्तर वर्षांचा" या मजकुराऐवजी, "खंड (क) च्या बाबतीत ऐंशी वर्षांचा आणि खंड (ख) च्या बाबतीत सत्तर वर्षांचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**डॉ. जी.नारायण राजू,**

सचिव, भारत सरकार.